न्यायालय खोली क्र. १४

मुंबई येथील मुंबई नगर दिवाणी न्यायालयातील वाणिज्यिक वाद क्र. २२१ सन २०२२ (सीपीसीच्या आदेश ५ नियम २०(१ए) अन्वये)

वाद सादर केला : २४.०८.२०२१
वाद नोंदवला : ३०.०३.२०२२
बँक ऑफ इंडिया .... वादी
विरूद्ध
मे. जन्नत टुर्स अँड ट्रॅव्हल्स आणि अन्य ....प्रतिवादी
प्रति,
१. मे. जन्नत टुर्स अँड ट्रॅव्हल्स
एक प्रोप्रायटरशीप संस्था, भारतीय रहीवासी, ज्यांचा पत्ता-बी-१३८, खोली क्र. आय-११२, आरएसडीएफ संकल्प वसाहत, वीर जिजामाता मार्ग, मानखुर्द (पश्चिम), मुंबई-४०००४३;
२. श्री. हनीफ कादर खान
मे. जन्नत टुर्स, अँड ट्रॅव्हल्सचे प्रोप्रायटर;
एक पौढ, भारतीय रहीवासी, ज्यांचा पत्ता -बी-१३८, खोली क्र. आय-११२, आरएसडीएफ संकल्प वसाहत, वीर जिजामाता मार्ग, मानखुर्द (पश्चिम), मुंबई-४०००४३;
...प्रतिवादी

प्रणाम, ज्याअर्थी उपरिनमित वादींनी उपरिनमित प्रतिवादींविरूद्ध ह्या नामदार न्यायालयात एक वाद दाखल केला ज्याचे संक्षिप्त खालीलप्रमाणे म्हणजेच
म्हणून वादी विनंती करतात की :-
ए. की, प्रतिवादींना येथे निशाणी ''एम'' असलेल्या दाव्याच्या तपशिलांमध्ये सविस्तर मांडलेल्या २५.०२.२०२० रोजीस शिल्लक थकबाकी रक्कम असलेल्या वाहन कर्ज खात्यांतर्गत रू. **३,१७,०५६.२३ (रूपये तीन लाख सतरा हजार छप्पन आणि पैसे तेहतीस मात्र)** ची रक्कम आणि तेव्हा पासून प्रदान व वसुलीपर्यंत **द.सा. ११.४०%** दराने पुढील व्याज अधिक न आकारलेले व्याज आणि प्रतिवादींनी जाहीर केलेल्या सदर तारणांच्या जतनासाठी वादींनी करावा लागणारा सर्व खर्च, आकार आणि परिव्यय वादींना अदा करण्याकरिता आदेश व हुकुम द्यावेत;
बी. की, जतन आणि अंमलबजावणीसाठी आलेल्या खर्चा सह वाद दाखल केल्या तारखे पासून अंतिम प्रदान आणि / किंवा वसुलीपर्यंत मासिक आधाराने उपरोक्त वाहन कर्ज-मुदत कर्ज सुविधा अंतर्गत संबंधित दराने व्याजासह एकत्रित निशाणी ''एम'' असलेल्या दाव्याच्या तपशिलात वर्णन केल्या प्रमाणे प्रतिवादींविरूद्ध हुकूम;
सी. की, वादाची सुनावणी आणि अंतिम निकाल प्रलंबित असल्याने, प्रतिज्ञापत्र सादर करून त्यांच्या संपूर्ण वैयक्तीक मत्ता घोषित करण्याचे निर्देश प्रतिवादींना द्यावेत.
डी. की, ह्या नामदार न्यायालयाने कृपा करून घोषित करावे की, प्रतिवादींनी वरील विनंती (ए) च्या बाबतीत देय रकमा हया त्यांनी घोषित केलेल्या प्रतिवादींच्या वैयक्तिक मत्ता/मिळकतींनी वादींच्या नावे वैधरित्या सुरक्षित केल्या आहेत आणि वादी त्या विकून रोकड करण्यास व त्यांच्या थकबाकी पोटी निव्वळ विक्री रक्कम वर्ग करण्यास हक्कदार आहेत;
ई. की, वादाची सुनावणी आणि अंतिम निकाल प्रलंबित असल्याने, कोर्ट रिसीव्हर, उच्च न्यायालय, मुंबई यांची दिवाणी प्रक्रिया सहिताच्या आदेश XL नियम १ अन्वये सर्व अधिकारांसह प्रतिवादींनी घोषित केलेल्या जंगम आणि स्थावर मिळकतींचे प्रापक म्हणून नियुक्ती कारावी आणि त्यांना त्या विकून त्याची रोकड करून निव्वळ विक्री रक्कम वादींकडे त्यांच्या दाव्यासाठी सुपूर्द करण्याचे अधिकार असावेत;
एफ. की, वादाची सुनावणी आणि अंतिम सुनावणी प्रलंबित असल्याने, प्रतिवादींना स्वतः त्यांचे नोकर आणि एजंटस यांना हया नामदार न्यायालयाच्या एका आदेश आणि मनाई हुकुमाद्वारे कोणत्याही प्रकारे प्रतिवादींनी घोषित केलेल्या जंगम आणि स्थावर मिळकती किंवा त्यांचा कोणताही हिस्सा यांची विक्री किंवा हस्तांतरण किंवा अभिहस्तांकन किंव अन्य संक्रमण किंवा भाग्रस्त किंवा कब्जात वाटे किंवा त्रयस्थ पक्षकारांचे हितसंबंध किंवा अधिकार करण्यास मज्जाव करावा;
जी. की, वादाची सुनावणी आणि अंतिम निकाल प्रलंबित असल्याने प्रतिवादींना तारण म्हणून हया नामदार न्यायालयात वाद दाखल करण्याच्या तारखेस वाद दावा असलेली रू. **३,१७,०५६.३३ (रूपये तीन लाख सतरा हजार छप्पन आणि तेहतीस मात्र)** ची रक्कम जमा करण्याचे निर्देश द्यावेत.
एच. की, वादाची सुनावणी आणि अंतिम निकाल प्रलंबित असल्याने, प्रतिवादी क्र. २ यांना हया नामदार न्यायालयाच्या परवानगी शिवाय भारत सोडण्यास हया नामदार न्यायालयाच्या एका आदेशाने मज्जाव करावा आणि हया नामदार न्यायालयात त्यांचा पासपोर्ट जमा करण्याचे निर्देश द्यावेत.
आय. वरील विनंती (बी) ते (जी) च्या बाबतील अंतरिमकालीन अनुतोषांसाठी;
जे. की, हया नामदार न्यायालयाने कृपा करून प्रतिवादींना वादाचे खर्च वादींना अदा करण्याचे आदेश द्यावेत.
के. की, हया नामदार न्यायालयासयास योग्य आणि वाजवी वाटतील असे अन्य आणि पुढील अनुतोष वादींच्या नावे हया नामदार न्यायालयाने कृपा करून मंजुर करावेत.
१. तुम्ही दाव्याला उत्तर देण्यासाठी २०.१२.२०२३ रोजी स. ११.०० वा. हया न्यायालयात व्यक्तीशः किंवा रितसर निर्देश दिलेल्या आणि वादाशी संबंधित सर्व महत्वाच्या प्रश्नांची उत्तरे देऊ शकेल अशा वकिलामार्फत किंवा जी अशा सर्व प्रश्नांची उत्तरे देईल अशा व्यक्तीसोबत हजर राहणे गरजेचे आहे आणि पुढे तुम्ही त्या दिवशी तुमचा बचाव किंवा वजावटीचा दावा किंव प्रति दावा ज्यावर अवलंबून असे तुमच्या ताब्यातील सर्व दस्तावेज किंवा शक्ती आणि तुमच्या बचावाच्या किंवा वजावटीच्या दाव्याच्या किंवा शक्ती आणि तुमच्या बचावाच्या किंवा वजावटीच्या दाव्याच्या किंवा प्रति दाव्याच्या पुष्ठ्यर्थ असे दस्तावेज सादर करावेत व तुम्ही असे दस्तावेज लेखी निवेदनाला जोडलेल्या सूचीच्या स्वरूपात सादर करावेत.
माझ्या हस्ते आणि हया नामदार न्यायालयाच्या शिक्क्याने दिले.
दिनांक : **१२ ऑगस्ट, २०२२**

शिक्का

प्रबांधकांसाठी
नगर दिवाणी न्यायालय, मुंबई

श्री. ओ. ए. दास
वादींसाठी वकील, ऑफीस नं. ७, १ला मजला,
रेहमान बिल्डिंग, २४, अकबरअलीज समोर,
फोर्ट, मुंबई-४०००२३
मोबाईल : ९८२१ ३३० ४५५

कर्ज वसुली न्यायाधिकरण

भारत सरकार, वित्त मंत्रालय (डीएफएस)
युनिट क्र. ३०७ ते ३१०, ३रा मजला, काकडे बिझ आयकॉन बिल्डिंग,
शिवाजी नगर, पुणे-४११००५

आर.पी. क्र. २६/२०२२ **रजि. पोस्ट-ॲक. ड्यू**

मत्ता दर्शविण्यासाठी सूचना

जारी तारीख: १०.११.२०२३
पुढील तारीख : ३१.०१.२०२४

बँक ऑफ इंडिया, शाखा येथे : खारघर, सेक्टर ३५, नवी मुंबई, महाराष्ट्र ....प्रमाणपत्र धारक
विरुध्द
मे. सेजल इन्फोकॉम,
प्रोप्रा. सौ. वंदना डी. चौधरी. ....प्रमाणपत्र कर्जदार
प्रति,
मे. सेजल इन्फोकॉम, प्रोप्रा वंदना डी. चौधरी.
पत्ता: दुकान क्र. ६सी, मानस टॉवर, सेक्टर १७, कामोठे, नवी मुंबई- ४१०२०९. येथे सुध्दा: लाईफ लाईन केमिस्ट, दुकान क्र. २७, पटेल हेरिटेज, सेक्टर २७, खारघर, मुंबई ४१०२१०.

ज्याअर्थी प्रमाणपत्र धारक बँकेने सदर मिळकत जप्त करणे आणि लिलावासाठी ठेवणे आणि विक्री प्रक्रियेसाठी मिळकतीकरिता निर्देश देण्यासाठी विनंती करणारा **३०.०८.२०२३** रोजी अर्ज **(निशाणी-०९)** (प्रत जोडलेली) प्रचालित केला आहे आणि न्यायाधिकारणाने परवानगी दिली आहे.
तुम्हाला याद्वारे निम्नस्वाक्षरीकारांसमोर **३१.०१.२०२४** रोजी किंवा पूर्वी मागील ३ वर्षाकरिता आयकर रिटर्न सह शपथेवर तुमच्या जंगम/स्थावर मत्तेचा तपशील दर्शविण्याचे निर्देश देण्यात येत आहे.
तुम्हाला त्यामुळे वरीलसदर वेळी व्यक्तीश: किंवा रितसर माहिती असलेले प्लिडर/वकिलांद्वारे हजर राहणे आणि काही असल्यास कागदोत्री पुरावे दाखल करणे आवश्यक आहे.
सूचना घ्यावी की, जर तुम्ही पुढील तारखेस आवश्यक तपशिल पुरविण्यास कसूर केल्यास योग्य ती कारवाई ॲक्टच्या तरतुदींनुसार तुमच्या विरोधात सुरु करण्यात येईल.
सदर **१० नोव्हेंबर, २०२३** रोजी माझ्या हस्ते आणि न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने दिले.

शिक्का

सही/-
(एस. जे. सातभाई)
वसुली अधिकारी-II
कर्ज वसुली न्यायाधिकरण, पुणे

बँक ऑफ इंडिया Bank of India BOI Relationship beyond banking

विरार (पू) शाखा: रिद्धी सिद्धी शॉपिंग सेंटर, पहिला मजला, नारिंगी फाटा, चंदनसार रोड, विरार (पू), ता. वसई, जि. ठाणे, महाराष्ट्र
ईमेल: VirarEast.MumbaiNorth@bankofindia.co.in

संद.क्र.: VIR/ADV/23-24:9 **दिनांक: २३.११.२०२३**

कब्जा सूचना (कलम १३(४))

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार **बँक ऑफ इंडिया, विरार पूर्व शाखा, रिद्धी सिद्धी रेसिडेन्सी, १ला मजला, व्ही एस मार्ग, विरार पूर्व - ४०१३०३, पालघर जिल्हा चे** प्राधिकृत अधिकारी या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ आणि कलम १३ (१२) सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ सहवाचता नियम ८ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **२०/०८/२०२०** रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार/गहाणदार **श्री. ओमकार रमेश चव्हाण, सौ. अपूर्वा ओमकार चव्हाण आणि श्री. रमेश नामदेव चव्हाण** यांस सूचनेतील नमूद रक्कम म्हणजेच **रु. २४,३१,५४१.६७** (रुपये चोवीस लाख एकतीस हजार पाचशे एकेचाळीस आणि सदुसष्ट पैसे मात्र) २०/०८/२०२० रोजीस संपूर्ण प्रदानापर्यंत देय पुढील व्याज, परिव्यय, प्रभार आणि खर्चाची परतफेड सदर सूचना प्राप्तीच्या तारखेपासून ६० दिवसांत करण्यास सांगितले होते.
रकमेची परतफेड करण्यास कर्जदार/गहाणदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार/गहाणदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा **कब्जा** त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून सदर ॲक्टच्या कलम १३ (४) सहवाचता सिक्युरीटी इंटरेस्ट एन्फोर्समेंट रुल्स, २००२ च्या नियम ८ अन्वये ह्या **२३ नोव्हेंबर, २०२३** रोजी घेतला आहे.
विशेषत: कर्जदार/गहाणदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा **बँक ऑफ इंडिया** यांस एकूण रक्कम **रु. २४,३१,५४१.६७** (रुपये चोवीस लाख एकतीस हजार पाचशे एकेचाळीस आणि सदुसष्ट पैसे मात्र) सह संपूर्ण प्रदानापर्यंतचे त्यावरील पुढील व्याज आणि खर्चाच्या अधीन राहील.
तारण मालमत्तेच्या भरणाकरिता उपलब्ध वेळेच्या संदर्भात ॲक्टच्या कलम १३ च्या उप कलम (८) च्या तरतुदींन्वये कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येते.

स्थावर मिळकतीचे वर्णन

फ्लॅट क्र. सी-००२, तळ मजला, सी-विंग, साई सपना अपार्टमेंट क्र. २ को-ऑप हाऊसिंग सोसायटी लि., मनवेलपाडा, विरार पूर्व - ४०१३०५, पालघर जिल्ह्याच्या समतुल्य गहाण येथील मळकतीचे ते सर्व भाग आणि विभाग.

दिनांक : २३/११/२०२३ **मुख्य व्यवस्थापक, (प्राधिकृत अधिकारी)**
स्थळ : विरार पूर्व. जि. पालघर **बँक ऑफ इंडिया**

---

kotak Kotak Mahindra Bank **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड** **ऑनलाईन ई-लिलाव मत्तेची विक्री**

नोंदणीकृत कार्यालय: २७ बीकेसी, सी२७, जी-ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पू.), मुंबई, महाराष्ट्र, पिन कोड-४०००५१, **शाखा कार्यालय:-** ॲडमास प्लाझा, ०५ वा मजला, १६६/१६, सीटीएस रोड, कलिना सांताक्रुझ (पू.), मुंबई-४०० ००९८

स्थावर मिळकतीच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या नियम ८(६) साठी परंतुकांसह नियम ८(५) अंतर्गत सिक्युरिटायझेशन ॲंड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेटस् ॲंड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत स्थावर मत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना.
सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदार आणि सहकर्जदार यांना सूचना याद्वारे देण्यात येते की खालील वर्णिलेली स्थावर मिळकत तारण धनकोंकडे गहाण/प्रभारित आहे, जिचा प्रत्यक्ष कब्जा हा **फुल्लर्टन इंडिया होम फायनान्स कंपनी लिमिटेड ('एचआयएफसीएल')** द्वारे त्यांच्या नावे कर्जाच्या अभिहस्तांकनाला अनुसरून **१९.१०.२०२३** रोजी कोटक महिंद्रा बँक लि., केएमबीएलच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतला आहे, ती **सौ. निशा प्रसाद घोलप, श्री. प्रसाद कांताराम घोलप, मे. श्री. चामुंडा एंटरप्रायझेस (कर्जदार आणि सहकर्जदार म्हणून)** कडून केएमबीएलला **थकीत कर्ज खाते क्र.** ६०१८०७२१०१७५३९२, **अंतर्गत** खर्च आणि प्रभारासह वसुली पर्यंत **२९.११.२०२३** पासून प्रयोज्य पुढील व्याजासह २८.११.२०२३ रोजीस **रु. ५३,६४,६५०/- (रुपये त्रेपन्न लाख चौसष्ट हजार सहाशे पन्नास मात्र)** च्या वसुलीकरिता ''जे आहे जेथे आहे'', ''जे आहे जसे आहे'', आणि ''जे काही आहे तेथे आहे'' तत्वाने विकण्यात येणार आहे. **राखीव किंमत** रु. ४,३०,०००/- (रुपये त्रेचाळीस लाख मात्र) आणि **इसारा अनामत रक्कम** रु. ४,३०,०००/- (रुपये चार लाख तीस हजार मात्र) राहील आणि इअरसह केवायसी सादर करण्याची अंतिम तारीख **०३.०१.२०२४** रोज सायं. ५.०० वा. (भाप्रवे) पर्यंत आहे.
मिळकतीचे वर्णन: गाव नवघर, भाईंदर (पूर्व) - ४०११०७ येथे स्थित सर्व्हे क्र. ३०४, नवीन सर्व्हे क्र. १७७, हिस्सा क्र. २ वर बांधलेल्या ''वासुदेव स्काय हाय कॉम्प्लेक्स'' अशा ज्ञात कॉम्प्लेक्सच्या ''माधव'' अशा ज्ञात बिल्डिंग क्र. १ मधील मोजमापित ४०.४१ चौ.मी. चटई क्षेत्र, १२ व्या मजल्यावरील फ्लॅट क्र. १२०२ चे सर्व ते भाग आणि विभाग.
कर्जदार आणि सहकर्जदारांचे लक्ष तारण मत्ता विमोचनासाठी उपलब्ध वेळेच्या संदर्भात सरफैसी ॲक्टच्या कलम १३ च्या पोटकलम ८ च्या तरतुदीकडे वेधण्यात येत आहे. सर्वसामान्य जनता आणि विशेषत: कर्जदारांनी सूचना घ्यावी की जर नियोजित लिलाव कोणत्याही कारणाने न होऊ शकल्यास तारण धनको तारण धनकोंच्या निर्देशाने जाहीर ई-लिलावामार्फत विक्रीच्या मागनि तारण हितसंबंधाची सक्तवसुली करतील. विक्रीच्या अंतर्गत तारण मत्तेच्या संदर्भात कोणतेही स्पष्टीकरण/आवश्यकतेच्या बाबतीत बोलीदार **श्री. क्षितिज अनंत +९१ ८१०४१११९६५), श्री. पंकज राय (+९१ ७७६८००३५६७)** यांना संपर्क करू शकतात. विक्रीच्या तपशिलवार म्हणजेच **www.kotak.com** आणि/किंवा **https://bankauctions.in** मध्ये दिलेल्या लिंक **https://www.kotak.com/en/bank-auctions.html** चा संदर्भ घ्यावा.
ठिकाण: भाईंदर - ठाणे **प्राधिकृत अधिकारी**
दिनांक: ०२.१२.२०२३ **कोटक महिंद्रा बँक लिमिटेड**

इंडियन बैंक Indian Bank

इलाहाबाद ALLAHABAD

अंधेरी पश्चिम शाखा : ११/१२, माधव नगर, एस.व्ही.रोड, अंधेरी (पश्चिम), मुंबई-४०००५८, महाराष्ट्र, फोन: ७७३८१५२०३५/ ७५६८५०७०१६, ईमेल: andheri@indianbank.co.in

कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरीता)
(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम-८(१) अन्वये)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **इंडियन बँक**चे नियुक्त **प्राधिकृत अधिकारी** या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **१७.०८.२०२३** रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार **सौ. सुनिता अमित अग्रवाल, श्री. अमित रमेश अग्रवाल, श्री. मनोज रमेश अग्रवाल आणि श्री. लालजीत श्यांबली यादव** यांस सूचनेतील एकूण नमूद रक्कम **रू. १२,३६,३४७/- (रुपये बारा लाख छत्तीस हजार तीनशे सत्तेचाळीस मात्र)** या रकमेची परतफेड सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून **६० दिवसांत** करण्यास सांगितले होते.
रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि **सर्वसामान्य जनतेस** याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा **कब्जा** सदर नियमावलीच्या नियम ८ सहवाचता सदर ॲक्टचे कलम १३(४) अन्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **२८ नोव्हेंबर २०२३** रोजी घेतला आहे.
विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा **इंडियन बँक** यांस रक्कम **रू. १२,३६,३४७/- (रुपये बारा लाख छत्तीस हजार तीनशे सत्तेचाळीस मात्र)** मागणी सूचना ची तारीख पासून त्यावरील व्याज आणि इतर प्रभार.
तारण मत्तेच्या विमोचनाकरीता उपलब्ध वेळेच्या संदर्भामध्ये ॲक्टच्या कलम (१३) च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधुन घेतले जात आहे.

स्थावर मिळकतीचे वर्णन:

फ्लॅट क्र.-३०४ आणि ३०५, ३रा मजला, ए विंग बिल्डिंग क्र.बी चे, साई प्रसाद अपार्टमेंट, महावीर नगर जवळ, देवदेव गाव, मिरा भाईंदर रोड, भाईंदर (पू), ठाणे-४०११०५.
मिळकती चे मालक : सौ. सुनिता अमित अग्रवाल, श्री. अमित रमेश अग्रवाल सीमाबद्ध खालीप्रमाणे :- उत्तरे- बिल्डिंग क्र. ३/बी, **दक्षिण -** इतर बिल्डिंग, **पूर्व-**इतर बिल्डिंग, **पश्चिम-** गार्डन

सही/-
दिनांक : २८.११.२०२३ **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : मुंबई, महाराष्ट्र **इंडियन बँक** करीता

इंडियन बैंक Indian Bank

इलाहाबाद ALLAHABAD

ब्रह्मांड शाखा : युनिव्हर्सल हाय स्कूल, धर्माचा पाडा, फेस-६, घोडबंदर रोड लगत, ब्रह्मांड, ठाणे (पश्चिम)-४००६०७, महाराष्ट्र; **फोन:** (०२२) २५८९ ९५८१/ २५८९ **ईमेल:** brahmand@indianbank.co.in

कब्जा सूचना (स्थावर मिळकतीकरीता)
(सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम-८(१) अन्वये)

ज्याअर्थी, निम्नस्वाक्षरीकार हे **इंडियन बँक**चे नियुक्त **प्राधिकृत अधिकारी** या नात्याने सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेटस् ॲन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट आणि कलम १३(१२) सहवाचता सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ अन्वये प्राप्त अधिकारांचा वापर करून दिनांक **२५.०५.२०२३** रोजी मागणी सूचना जारी करून कर्जदार **श्री. शशिकांत जे. सोनवणे, श्री. जगन्नाथ रघुनाथ सोनवणे** सह **ब्रह्मांड शाखा** यांस सूचनेतील एकूण नमूद रक्कम **रू. १६,१६,३३४/- (रुपये सोळा लाख सोळा हजार तीनशे चौतीस मात्र) २३.०५.२०२३** पर्यंत आणि या रकमेवर **२५.०५.२०२३** पासून मान्य दराने पुढील व्याज असेल या रकमेची परतफेड सदर सूचनेच्या प्राप्तीच्या तारखेपासून **६० दिवसांत** करण्यास सांगितले होते.
रकमेची परतफेड करण्यात कर्जदार असमर्थ ठरल्याने, कर्जदार आणि **सर्वसामान्य जनतेस** याद्वारे सूचना देण्यात येते की, निम्नस्वाक्षरीकारांनी खाली वर्णन करण्यात आलेल्या मिळकतीचा **कब्जा** सदर नियमावलीच्या नियम ८ सहवाचता सदर ॲक्टचे कलम १३(४) अन्वये त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून दिनांक **२९ नोव्हेंबर २०२३** रोजी घेतला आहे.
विशेषत: कर्जदार आणि सर्वसामान्य जनतेस याद्वारे इशारा देण्यात येतो की, सदर मिळकतीशी कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मिळकतीशी करण्यात आलेला कोणताही व्यवहार हा **इंडियन बँक**, **ब्रह्मांड शाखा** यांस रक्कम **रू. १६,१६,३३४/- (रुपये सोळा लाख सोळा हजार तीनशे चौतीस मात्र) २३.०५.२०२३** पर्यंत आणि या रकमेवर **२५.०५.२०२३** पासून परतफेडीच्या तारखेपर्यंत सहमत दराने पुढील व्याजे आहे.
२९.११.२०२३ रोजी ब्रेकअपचे तपशील खाली दिले आहेत.

खाते क्र.	बुक बॅलन्स	अचूक व्याज	थकबाकी दंड	शुल्क/प्रभार/ एमओएक्स	एकूण
इंड मॉटगेज **कर्ज खाते क्र.** ६७३८३८७२३६	१६,१६,३३४/-	१३,५३,५३०/-	-	०	२९,६९,८६४.००
कर्ज खाते मधील एकूण देय					२९,६९,८६४.००

तारण मत्तेच्या विमोचनाकरीता उपलब्ध वेळेच्या संदर्भामध्ये ॲक्टच्या कलम (१३) च्या उप-कलम (८) च्या तरतुदींकडे कर्जदारांचे लक्ष वेधुन घेतले जात आहे.

स्थावर मिळकतीचे वर्णन:

फ्लॅट क्र. ००४, तळ मजला, **मोजमापित चटई क्षेत्र ४०० चौ.फू.**, बिल्डिंग क्र. सी-३, **विघ्नहर्ता सीएचएस लि.**, यशोधन नगर, पांचपाखाडी, ठाणे (प)- ४००६०६ चे ते सर्व भाग आणि विभाग.
मिळकती चे मालक : श्री. जगन्नाथ रघुनाथ सोनवणे

सही/-
दिनांक : २९.११.२०२३ **प्राधिकृत अधिकारी**
ठिकाण : मुंबई, महाराष्ट्र **इंडियन बँक** करीता

प्रपत्र क्र. ३
[नियम-१५(१)(ए) पहा)]/ १६(३)

कर्ज वसुली न्यायाधिकरण मुंबई (डीआरटी ३)

१ ला मजला, एमटीएनएल टेलिफोन एक्स्चेंज बिल्डिंग, सेक्टर-३०ए, वाशी, नवी मुंबई-४०० ७०३.

खटला क्र. ओए/७४९/२०२३

कर्ज वसूली न्यायाधिकरण(कार्यवाही) रुल्स, १९९३ च्या नियम ५ च्या उप-नियम (२ए) सहवाचता ॲक्टच्या कलम १९ च्या उप-कलम(४) अंतर्गत समन्स.

परि. क्र. ९

बँक ऑफ बडोदा
विरुद्ध
मे टीस्टा क्रॉप केअर प्रा लि

प्रति,
१) मे टीस्टा क्रॉप केअर प्रा लि
२०२ संतोष निवास अशोक नगर रोड दादर कॉलनी भांडुप पूर्व मुंबई, महाराष्ट्र-४०००४२
२) अमित सुबिनय रॉय
येथे ब्लॉक क्र.२२, अश्वघोष को ऑप हाऊसिंग सोसायटी लि, अशोक नगर, दातार कॉलनी भांडुप पूर्व मुंबई, महाराष्ट्र-४०००४२.
३) नरेंद्र श्रीनिवास हेगडे
४/डी-१०, विजय विहार सोसायटी, सायन ट्रॉम्बे रोड, चेंबूर, मुंबई, महाराष्ट्र-४०००७१,
४) राजेंद्र केवलदास शाह,
४०७-बी, औदुंबर को ऑप हाऊसिंग सोसायटी लि, शिवाजी नगर, पोखरन रोड क्र.०१, ठाणे, महाराष्ट्र
५) शशिलेखा नारायणा
हरि संस्कृती, उपासना ७०६, खारजुई मळा, सिन्नर फाटा, निसर्ग लॉन समोर, नाशिक रोड, पूर्व, नाशिक महाराष्ट्र-४२२१०१

समन्स

ज्याअर्थी, वरील नमूद **ओए/७४९/२०२३** नामदार प्रबंधक/पीठासिन अधिकाऱ्यांसमोर **२१/०४/२०२३** रोजी सूचीबद्ध केला होता.
ज्याअर्थी, नामदार न्यायाधिकरणाने कृपावंत होऊन **रु. ३०६४२१५.९३/-** च्या कर्जाच्या वसुलीसाठी तुमच्याविरुद्ध दाखल केलेल्या ॲक्टच्या कलम १९(४) अंतर्गत सदर अर्जावर (ओ.ए.) समन्स/सूचना जारी केली. (जोडलेल्या दस्तावेजांच्या प्रतींसह अर्ज).
ॲक्टच्या कलम १९ च्या पोट-कलम (४) नुसार, तुम्हा प्रतिवादींना खालीलप्रमाणे निर्देश देण्यात येत आहेत.
(i) विनंती केलेल्या अनुतोषांना मंजुरी का देऊ नये त्याची समन्सच्या बजावणीच्या ३०(तीस) दिवसांत कारणे दाखविण्यासाठी;
(ii) मूळ अर्जाच्या अनु. क्र. ३ए अंतर्गत अर्जदारांनी विनिर्दिष्ट केलेल्या मिळकती आणि मत्तांव्यतिरिक्त अन्य मिळकती आणि मत्तांचे तपशील जाहीर करणे;
(iii) मिळकतींच्या जप्तीसाठीच्या अर्जावरील सुनावणी आणि निकाल प्रलंबित असल्याने मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक अंतर्गत जाहीर केलेल्या अशा अन्य मत्ता आणि मिळकतींचा आणि तारण मत्तांचा व्यवहार करण्यास किंवा त्या निकाली काढण्यास तुम्हाला मज्जाव करण्यात आला आहे.
(iv) तुम्ही न्यायाधिकरणाची पूर्व परवानगी घेतल्याखेरीज ज्यावर तारण हितसंबंध बनवले आहेत त्या कोणत्याही मत्तांची आणि/किंवा मूळ अर्जाच्या अनु. क्रमांक ३ ए अंतर्गत जाहीर किंवा विनिर्दिष्ट केलेल्या अन्य मत्ता आणि मिळकतींचे त्यांच्या व्यवसायाच्या सामान्य कामकाजाव्यतिरिक्त विक्री, भाडेपट्टा किंवा अन्य प्रकारे हस्तांतरण करणार नाहीत.
(v) व्यवसायाच्या नियमित कामकाजाच्या ओघांत तारण मत्ता किंवा अन्य मत्ता व मिळकती यांच्या विक्रीतून रोकड झालेल्या विक्री रकमेचा हिशोब देण्यास तुम्ही बांधील असाल व अशी विक्री रक्कम अशा मत्तांवर तारण हितसंबंध धारण करणाऱ्या बँक किंवा वित्तीय संस्थेकडे ठेवलेल्या खात्यामध्ये जमा केली पाहिजे.
तुम्हाला **१७/०१/२०२३ रोजी सकाळी १०.३० वा.** लेखी निवेदन सादर करून त्याची एक प्रत अर्जदारांना सादर करण्याचे व प्रबंधकांसमोर हजर राहण्याचे देखील निर्देश देण्यात येत आहेत, कसूर केल्यास, तुमच्या गैरहजेरीत अर्जावर सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.
माझ्या हस्ते आणि ह्या न्यायाधिकरणाच्या शिक्क्याने ह्या दिनांक: १४/११/२०२३ रोजी दिले.

(संजई जैस्वाल)
प्रबंधक
डीआरटी-III, मुंबई

न्यायालय खोली क्र. १४

मुंबई येथील मुंबई नगर दिवाणी न्यायालयातील वाणिज्यिक वाद क्र. २२० सन २०२२ (सीपीसीच्या आदेश ५ नियम २०(१ए) अन्वये)

वाद सादर केला : २४.०८.२०२१
वाद नोंदवला : ३०.०३.२०२२
बँक ऑफ इंडिया .... वादी
विरूद्ध
मे. मिष्टी टुर्स अँड ट्रॅव्हल्स आणि अन्य ....प्रतिवादी
प्रति,
१. मे. मिष्टी टुर्स अँड ट्रॅव्हल्स
एक प्रोप्रायटरशीप संस्था, भारतीय रहीवासी, ज्यांचा पत्ता-खोली क्र. ५०५, १९/सी, निसर्ग को-ऑप-हाऊसिंग सोसायटी, न्यू गौतम नगर, गोवंडी (पश्चिम), मुंबई -४०००४३
२. श्री. राजेश मधुकर पारखे
मे. जन्नत टुर्स, अँड ट्रॅव्हल्सचे प्रोप्रायटर;
एक पौढ, भारतीय रहीवासी, ज्यांचा पत्ता -खोली क्र. ५०५, १९/सी, निसर्ग को-ऑप-हाऊसिंग सोसायटी, न्यू गौतम नगर, गोवंडी (पश्चिम), मुंबई -४०००४३
...**प्रतिवादी**

प्रणाम, ज्याअर्थी उपरिनमित वादींनी उपरिनमित प्रतिवादींविरूद्ध ह्या नामदार न्यायालयात एक वाद दाखल केला ज्याचे संक्षिप्त खालीलप्रमाणे म्हणजेच
म्हणून वादी विनंती करतात की :-
ए. की, प्रतिवादींना येथे निशाणी ''क्यु'' असलेल्या दाव्याच्या तपशिलांमध्ये सविस्तर मांडलेल्या १७.०३.२०२० रोजीस शिल्लक थकबाकी रक्कम असलेल्या वाहन कर्ज खात्यांतर्गत रू. **१०,४३,१२५.८५ (रूपये दहा लाखे त्रेचाळीस हजार एकशे पंचवीस आणि पंच्याऐंशी पैस मात्र)** ची रक्कम आणि तेव्